**शिवाजी विद्यापीठ :** शिवाजी विद्यापीठात भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील आदी उपस्थित होते.

# 'पोत सुधारण्यासाठी तण जमिनीतच कुजवा'

कोल्हापूर टाइम्स टीम

तण जमिनीतच कुजविण्याची प्रक्रिया केल्यास जमिनीची पोत सुधारण्यास मदत होते. शेतकऱ्यांच्या भविष्यासाठी सूक्ष्मजीवशास्त्र हा महत्त्वाचा विषय आहे. पण, त्याबद्दल शेतकऱ्यांमध्ये असणारा अजाणतेपणा घालविण्यासाठी या विषयाची माहिती शेतकऱ्यांना करून देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्रगतशील शेतकरी प्रताप चिपळूणकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या सूक्ष्मजीवशास्त्र अधिविभागामार्फत 'सूक्ष्मजीवशास्त्राचे शेतीसाठी योगदान' या विषयावर आयोजित व्याख्यानात चिपळूणकर बोलत होते. अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत अध्यक्षस्थानी होते.

सूक्ष्मजीवांचा शेतीमधील सहभाग व पिकाच्या वाढीसाठी योगदानाबद्दल मार्गदर्शन करत असताना डॉ. चिपळूणकर यांनी प्रगत व पारंपरिक शेतीतील जुन्या पद्धतीचा वापर चुकीच्या पद्धतीने कसा केला जातो व तो कसा सुधारावा यावर भाष्य केले. ते म्हणाले, 'सूक्ष्मजीवांच्या पर्यावरणातील वेगवेगळ्या प्रक्रियांचा शेतीमध्ये वापर केला जातो. मातीमधील सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढवण्यासारख्या प्रयोगांची माहिती दिली.' यावेळी सूक्ष्मजीवशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. के. डी. सोनवणे, सहाय्यक प्राध्यापक एस. आर. वाघमारे, एन. एच. नदाफ, जे. व्ही. कुवर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 AUG 2018
महाराष्ट्र टाईम्स

**शिवाजी विद्यापीठ** : शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 AUG 2018
पुढारी

**शिवाजी विद्यापीठ :** शिवाजी विद्यापीठात भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 AUG 2018
महाराष्ट्र टाईम्स

# 'पोत सुधारण्यासाठी तण जमिनीतच कुजवा'

**कोल्हापूर टाइम्स टीम**

तण जमिनीतच कुजविण्याची प्रक्रिया केल्यास जमिनीची पोत सुधारण्यास मदत होते. शेतकऱ्यांच्या भविष्यासाठी सूक्ष्मजीवशास्त्र हा महत्त्वाचा विषय आहे. पण, त्याबद्दल शेतकऱ्यांमध्ये असणारा अजाणतेपणा घालविण्यासाठी या विषयाची माहिती शेतकऱ्यांना करून देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्रगतशील शेतकरी प्रताप चिपळूणकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या सूक्ष्मजीवशास्त्र अधिविभागामार्फत 'सूक्ष्मजीवशास्त्राचे शेतीसाठी योगदान' या विषयावर आयोजित व्याख्यानात चिपळूणकर बोलत होते. अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत अध्यक्षस्थानी होते.

सूक्ष्मजीवांचा शेतीमधील सहभाग व पिकाच्या वाढीसाठी योगदानाबद्दल मार्गदर्शन करत असताना डॉ. चिपळूणकर यांनी प्रगत व पारंपरिक शेतीतील जुन्या पद्धतीचा वापर चुकीच्या पद्धतीने कसा केला जातो व तो कसा सुधारावा यावर भाष्य केले. ते म्हणाले, 'सूक्ष्मजीवांच्या पर्यावरणातील वेगवेगळ्या प्रक्रियांचा शेतीमध्ये वापर केला जातो. मातीमधील सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढवण्यासारख्या प्रयोगांची माहिती दिली.' यावेळी सूक्ष्मजीवशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. के. डी. सोनवणे, सहाय्यक प्राध्यापक एस. आर. वाघमारे, एन. एच. नदाफ, जे. व्ही. कुवर उपस्थित होते.

1 8 AUG 2018

महाराष्ट्र टाईम्स

# 'समानतेची सुरुवात कुटुंबांपासून व्हावी'

कोल्हापूर टाइम्स टीम

'सार्वजनिक ठिकाणी केवळ चर्चा करून स्त्री-पुरुष समानता येणार नाही, तर प्रत्येकाने याची सुरुवात स्वतःच्या घरापासून करणे गरजेचे आहे. निसर्गात स्त्री-पुरुष असा भेदभाव नाही. दोघांच्या समन्वयातूनच समाज घडतो. ताराबाई शिंदे, महात्मा फुले, शाहू महाराज यांनी स्वतःच्या कृतीतून स्त्री-पुरुष समानतेचा संदेश दिला आहे,' असे प्रतिपादन प्रा. डॉ. भारती पाटील यांनी केले.

राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमध्ये महिला सचेतन समिती व प्राध्यापक प्रबोधिनी अंतर्गत आयोजित केलेल्या स्त्री-पुरुष समानता या विषयावर त्या बोलत होत्या. व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी कॉलेजचे प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे होते. महिला सचेतना समिती समन्वयक प्रा. सायरा मुलाणी यांनी प्रास्ताविक केले.

प्राध्यापक प्रबोधिनीचे प्रमुख प्रा. एम. एम. पाटील यांनी आभार मानले, तर प्रा. सुज्ञानी चौगुले यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.